# Vinayak Vidnyan Mahavidyalaya, Nandgaon Kh.
# Women Cell
# Session 2017-18

**Guest lecture on Women Security by Adv. Prajakta Raut**
**Date: 03-01-2018**






हिंदुस्थान

## तुम्हीच तुमच्या रक्षणकर्त्या : ॲड. प्राजक्ता राऊत

व्याख्यान : महिला सुरक्षा

नांदगाव खंडेश्वर दि. ३१ : विद्यार्थ्यांनो, तुम्हीच तुमच्या रक्षणकर्त्या आहात. दिवसेंदिवस सुरक्षित परत येईल, किंवा नाही या काळजीने प्रत्येक मुलीचे पालक धास्तावलेले आहे. या देशामध्ये महिलांसाठी सर्वात जास्त कायदे आहेत. परंतु याच देशामध्ये सर्वात जास्त अत्याचार हे महिलांवर होत आहेत ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. स्त्री ही कितीही मोठ्या पदावर गेली तरी तिच्या बुद्धीमत्तेकडे अन् कर्तृत्वाकडे अद्यापही एका सहानुभूतीपूर्वक दृष्टीकोनातून पाहिले जाते. एकटी स्त्री म्हणजे असुरक्षित असा समज खोलवर रुजलेला आहे. हा समज उलथून टाकला पाहिजे, असे आवाहन ॲड. प्राजक्ता मंगेश राऊत यांनी स्व. प्रविण खोडके वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित महिला सुरक्षा निमित्ताने कार्यक्रमामध्ये केले.

आपल्या भाषणात ॲड. प्राजक्ता राऊत पुढे म्हणाल्या की, महिलांनो तुमच्या हातून असे कर्तृत्व घडवा की तुमच्या पालकांना गुरुवर्यांना गर्व वाटला पाहिजे. तुम्हीच तुमचे आयुष्य घडवू शकता आणि बिघडवूही शकता. कधीही कुणावर आंधळा विश्वास ठेवू नका. माता पित्याचा विश्वासघात करु नका. स्वतःचे संरक्षण स्वतःच करायला शिका. तुम्हीच तुमच्या रक्षणकर्त्या व्हा असे प्रतिपादनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुचिता खोडके यांनी केले.



लोकशाही वार्ता

गुड मॉर्निंग अमरावती

मंगळवार, ०९ जानेवारी २०१

## पंखामध्ये बळ असेल तरच स्वप्नपूर्ती शक्य

### ॲड. प्राजक्ता राऊत यांचे प्रतिपादन

### विनायक विज्ञान महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधी

समाजाचे भान ठेवून निर्भय व्हा, परिस्थितनुसार तत्पर रहायला शिका जेने करून तुम्ही तुमचे ध्येय गाठण्याचे स्वप्न पूर्ण करू शकाल. कारण पंखांमध्ये बळ असेल तर स्वप्नपूर्तीची अपेक्षा बाळगावी. असे मत, ॲड. प्राजक्ता राउत यांनी विनायक विज्ञान महाविद्यालय नांदगाव खंडेश्वर येथे सावित्रीबाई फुले जयंती निमीत्त आयोजित कार्यक्रमा दरम्यान बोलताना व्यक्त केले.

३ जानेवारी २०१८ रोजी विनायक विज्ञान महाविद्यालय नांदगाव खंडेश्वर येथे महिला दक्षता समिती व राष्टीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनो निर्भय व्हा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला प्रमुख वक्त्या म्हणुन ॲड. प्राजक्ता राउत (मशिदकर), अध्यक्षस्थानी विनायक विज्ञान महाविद्यालय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पोकळे सर तसेच डॉ. सुचिता खोडके, प्रा. जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. व्याख्याना दरम्यान प्रमुख प्रवक्त्या ॲड. प्राजक्ता राउत यांनी विद्यार्थ्यांना निर्भय व्हा या विषयावर महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी ध्येय गाठण्यासाठी स्वप्न पाहणे गरजेचे आहे. कारण स्वप्न पाहणाऱ्यांचीच स्वप्न पूर्ण होतात पण त्यासाठी समाजाचे भान ठेवून निर्भय होणे सुध्दा तितकेच गरजेचे आहे. उंच भरारी घेण्यासाठी पंखानमध्येही बळ असाव लागत पण ते बळ समाजाकडून मिळण्याची अपेक्षा करण्यापेक्षा स्वतामध्ये बुलंद आत्मविश्वास निर्माण करा की, तुम्ही स्वताचे पंख स्वताच बळकट करून आकाशात स्वच्छंद भरारी घेवू शकाल. त्यामुळे यासर्वासाठी आधी विद्यार्थ्यांना स्वताच निर्भय होण्याची गरज आहे. असे प्रेरणादायी मार्गदर्शनही यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. डॉ. सुचिता खोडके यांनीही विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन करून महिला दक्षता समितीसदंर्भात विशेष मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पोकळे यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रा. लिना इखार यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# Vinayak Vidnyan Mahavidyalaya, Nandgaon Kh.
# Women Cell
# Session 2017-18

**Janivancha Jagar Abhiyan-**

**Theme-Poster Competition on Gender Equality**

**Date: 25th August 2017**










**Flower Arrangement Competition**

**Date: 27th January 2018**








# Vinayak Vidnyan Mahavidyalaya, Nandgaon Kh.
# Women Cell
# Session 2017-18

**Dish Decoration**

**Date: 16-02-2018**



